Sir,
Draft for approval pl.
Sd/-
AR-EBU

का.प्रा.वि/आयसी.डी/२०१९-२०/६६२
१८ फेब्रुवारी,२०२०

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र./२०१९-२०

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१९-२० मधील ७ फेब्रुवारी,२०२० च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१९-२० मधील दहावी बैठक शुक्रवार दिनांक ७ फेब्रुवारी,२०२० रोजी बैठक सकाळी ११.०० वाजता व्यवस्थापन परिषदेचे दालन, फोर्ट परीसर, मुंबई-४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४. | प्रा. (श्रीमती.) रश्मी ओझा | सदस्या |
| ५. | प्राचार्य (डॉ.) अजय भामरे | सदस्य |
| ६. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ७. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ८. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ९. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १०. | श्रीमती माधवी इंगोले (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |
| ११. | डॉ. विनोद पाटील (संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १२. | डॉ. अजय देशमुख, कुलसचिव | सदस्य सचिव |

➤ **स्वागत :-**

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली.

➤ **अनुपस्थिती :-**

श्री. प्रदीप सांवत, डॉ. राजेश खरात, प्रा.बी. एन. जगताप यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.



SK

Scanned by CamScanner

- **श्रध्दांजली**

**डॉ. विद्या बाळ**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या लेखक आणि संपादक डॉ. विद्या बाळ यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक ३० जानेवारी,२०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षाच्या होत्या.

- **अभिनंदन**

सभेच्या सुरुवातीला व्यवस्थापन परिषदेची ही सभा पहिल्यांदाच ई-प्रशासनामार्फत होत आहे. ही व्यवस्था निर्माण करण्यासाठी मा.कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली समिति गठित करण्यात आली होती. सदर समितीमध्ये प्रा. बी.एन. जगताप व प्रा. वैभव नरवडे यांचा समावेश होता. सदर समितीने अत्यंत मोलाचे योगदान देऊन ई-प्रणाली निर्माण करुन विविध प्राधिकरणांच्या सभा ई-प्रशासनामार्फत आयोजित करण्याचा मार्ग प्रशस्त व सुकर केल्याबद्दल समितीच्या सदस्यांचे प्र-कुलगुरु, प्रा.बी.एन. जगताप, प्रा. वैभव नरवडे यांचे तसेच श्रीवरमंगाई, संचालक, युसीसी व विभाग प्रमुख आयटी विभाग, व त्यांचे सहकारी श्री. रोहित चौबे आणि कु. आम्रपाली तायडे तसेच श्रीमती संजना सावंत, सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग यांनी देखील ही यंत्रणा निर्माण करण्यामध्ये प्रशासकिय सहकार्य दिले. यासर्वांच्या अभिनंदनाचा ठराव कुलसचिवांनी मांडला त्यास प्रा.(डॉ.) अजय भामरे यांनी अनुमोदन दिले. या अभिनंदनाच्या प्रस्तावावर चर्चा करताना मुंबई विद्यापीठ प्रशासनाने प्राधिकरणांच्या सभा ई-प्रशासनामार्फत घेण्याचा महत्त्वकांक्षी उपक्रम कार्यान्वित केल्याबद्दल ॲड. नील हेळेकर यांनी मा. कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव आणि समितीचे सदस्य तसेच कार्यकारी प्राधिकरणे विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. या अभिनंदनाच्या ठरावातील चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. दिपककुमार मुकादम यांनी सहभाग घेतला.

- 

ॲड. नील हेळेकर यांनी श्री. योगेश सोमण, संचालक, ॲकॅडमी ऑफ थिएटर आर्टस् यांना विद्यापीठाने सुट्टीवर पाठविले की ते सुट्टीवर गेले याबाबत स्पष्टता करावी, असे सांगितले. सदर चर्चेत श्री. दिपककुमार मुकादम व प्राचार्य (डॉ.) अजय भामरे यांनी सहभाग घेतला. प्रा. वैभव नरवडे यांनी श्री. योगेश सोमण यांना नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे त्यांचे म्हणने एकुण घेण्याची संधी दायवयास हवी होती, असे सांगुन याबाबत मुक्ता संघटनेने दिलेल्या निवेदनाचा विचार करावा, अशी विनंती केली.

| बाब क. १ | **दि. ३ जानेवारी, २०२० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
|---|---|---|
| **ठराव** | दि. ३ जानेवारी, २०२० रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त खालील सुधारणासह मान्य करण्यात आले:-<br>**सुधारित ठराव**<br>**बाब क. ३ मुंबई विद्यापीठातील बंद/वापरात नसलेल्या/जुन्या स्थितीतील वाहनांची विक्री करण्याबाबत समितीने सादर केलेला तात्पुरता अहवाल (Interim Report) सादर करण्याबाबत.**<br>प्राचार्य(डॉ.) अजय भामरे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा | |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | अंतरिम अहवालानुसार मा.कुलगुरु (MH-01-BK-1857) व प्र.कुलगुरु (MH-01-BF-6291) यांच्या जुन्या गाडया प्रचलित पद्धतीनुसार विकण्याची मान्यता देण्यात आली तथापी गाडयांचे बाजार मुल्यांकन OLX किंवा CARS 24 इत्यादी किंवा तत्सम कुठल्याही एकापेक्षा अधिक संस्थेकडून करून घ्यावे. E-auction माध्यमातून गाडयाच्या किंमती समान आल्यास अशा परिस्थितीमध्ये मुंबई विद्यापीठ कर्मचा-यांना प्राधान्य देण्यात यावे. | |
| बाब क. २ | **दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवाल.** | कार्यकारी प्राधिकरण |
| ठराव | दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |
| बाब क. ३ | **मुंबई विद्यापीठाला विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय उभारण्याकरीता ज्या ११ कुटुंबानी आंबडवे येथे जमीन दान केली त्यापैकी प्रत्येक कुटंबातील एका व्यक्तीस विद्यापीठ सेवेत कायमस्वरूपी सामावून घेणेबाबतची बाब.** | आस्थापना विभाग १ व ३ |
| ठराव | मुंबई विद्यापीठाला विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय उभारण्याकरीता ज्या ११ कुटुंबानी आंबडवे येथे जमीन दान केली त्यापैकी प्रत्येक कुटंबातील एका व्यक्तीस विद्यापीठ सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याकरिता महाराष्ट्र शासनाकडे नविन पदे निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदी अंतर्गत मंजूरी घेण्यात यावी. | |
| बाब क. ४ | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२१ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ आणि २०१९-२० करीता विषय बंद करणे व विद्यार्थी संख्या कमी करणे यासाठी ४२ (विषय बंद) व ०६ (विद्यार्थी संख्या कमी) असे एकूण ४८ महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत.** | संलग्नता व मान्यता विभाग |
| ठराव | याबाबत चर्चेच्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, महाविद्यालय बंद करण्यासाठी गठित केलेल्या समितीस तातडीने अहवाल सादर करण्याच्या सुचना देण्यात याव्यात व अहवाल सादर केल्यानंतर ही बाब पुनश्च व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करण्यात यावी. | |
| बाब क. ५ | **दिनांक ६ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.** | विद्यापीठ क्षेत्र विकास कक्ष |
| ठराव | दिनांक ६ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| बाब क. ६ | **मुंबई विद्यापीठाचे २०१९-२०२० चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज व २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा** | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | वित्त व लेखा अधिकारी यांनी २०१९-२०२० चे सुधारीत अर्थसंकल्पिय व २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा सादर केला. त्यांना ॲड. नील हेळेकर यांनी अनुमोदन दिले. डॉ. रविकांत सागुर्डे यांनी सदर अर्थसंकल्पाची बाब अभ्यास करण्यास पुरेसा वेळ न दिल्याने त्यांचा आक्षेप नोंदविला. सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दि. ४ फेब्रुवारी, २०२० रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बाब क. ५ अन्वये सुधारणेसह सुचविलेल्या शिफारशीनुसार मुंबई विद्यापीठाचे २०१९-२०२० चे सुधारीत | |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | अर्थसंकल्पिय अंदाज व २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा मान्य करण्यात आला. सदर अर्थसंकल्पिय अंदाज महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९(छ) प्रमाणे अधिसभेच्या मान्यतेकरिता सादर करावा, अशी शिफारस करण्यात आली. प्राचार्य डॉ. अजय भामरे, अधिष्ठाता वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा यांना २०१९-२०२० चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसूदा व सन २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा अधिसभेमध्ये सादर करण्यासाठी नामनिर्देशित करण्यात आले. वित्त व लेखा अधिकारी त्यांना सहाय्य करतील. प्राचार्य डॉ. अजय भामरे, अधिष्ठाता वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत कलेल्या अर्थसंकल्प समितीने अथक परिश्रम करून अर्थसंकल्प पूर्णत्वास नेल्या बददल सर्वानुमते अभिनंदनाचा ठराव मंजूर झाला.<br>डॉ. रविकांत सागुर्डे यांनी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहासाठी अर्थसंकल्प मध्ये तरतुद करण्यात यावी, असे सूचविले असता मा. कुलगुरूंनी वसतिगृहासाठी अर्थसंकल्पमध्ये तरतुद करण्याचे मान्य केले. माा. कुलगुरूंनी सूचविले की, विविध विभागातील अर्थसंकल्प मधील तरतुदींचे सनियंत्रण करण्यासाठी समिती नेमावी. समिती गठित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| समिती | १. Prof. Kavita Laghate, Director JBIMS<br>२. Prof. Kharat, Dean, Humanities<br>३. Prof. Majumdar, Dean, Sci & Technology | |
| बाब क्र. ७ | **सुरक्षा रक्षकांच्या विशेष अतिरीक्त भत्त्याबाबत.** | **सुरक्षा विभाग** |
| **ठराव** | सुरक्षा रक्षकांच्या विशेष अतिरीक्त भत्त्याबाबतचा प्रस्ताव वित्त व लेखा समिती पुढे ठेवण्यात यावा. | |
| **बाब क्र. ८** | **श्री. एस. टी. मोरे व इतर कर्मचा-यांच्या पदोन्नतीच्या प्रकरणासंदर्भात गठीत केलेल्या समितीचा प्राप्त अहवाल विचारार्थ सादर.** | **आस्थापना विभाग १ व ३** |
| **ठराव** | श्री. एस. टी. मोरे व इतर कर्मचा-यांच्या पदोन्नतीच्या प्रकरणासंदर्भात गठीत केलेल्या समितीचा अहवालावर अध्यक्षांची सही नव्हती म्हणुन ही बाब पुनश्च: सादर करण्यात आली. समितीचे अध्यक्ष सहसंचालक, श्री. राहीदास काळे यांनी कार्य व्यस्ततेमुळे समितीवर कार्य करण्यास असमर्थता दर्शविल्याचे कळविले होते त्यामुळे त्यांची स्वाक्षरी अहवालावर नाही, असे कुलसचिवांनी सांगितले. तसेच श्री. एस. टी. मोरे व इतर कर्मचाऱ्यांना २०१७ मधे पदोन्नती दयायला हवी होती पण ती त्यांना दिली गेली नव्हती त्यांनतर २०१८ मध्ये त्यांना पदोन्नती देण्यात आली व त्या काळचे वेतनही त्यांना देण्यात आले होते. एप्रिल २०१८ मधे ते निवृत्त झाले त्या एका महिन्याचे जे रूपये ५५५२/- फरक आहे तो देण्यास मान्यता देण्यात आली. समितीने शिफारस केल्यानुसार इतर कर्मचाऱ्यांच्याबाबतीही कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. | |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ९ | **लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ येथे ९ शिक्षकेत्तर तांत्रीक पदे ५ वर्ष कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने भरण्याकरिता निर्माण करण्यात यावी. तसेच सदर पदे हंगामी स्वरुपात ११ महिन्याकरिता भरण्याकरीता शैक्षणिक अर्हता, वय व ठोक मानधन ठरविण्याबाबत.** | आस्थापना विभाग १ व ३ |
| ठराव | लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ येथे ९ शिक्षकेत्तर तांत्रीक पदे ५ वर्ष कालावधीकरीता निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर पदे ११ महिन्याकरिता हंगामी स्वरुपात भरण्यात यावीत, तसेच सदर पदे भरताना त्यांच्या शैक्षणिक अर्हता, वय व ईतर बाबींचा विचार करण्यात यावा. | |
| बाब क्र. १० | **Approval for conversion of post of Director CCF to post of Director Department of ICT (DoICT) which is been created under Board of Information & Technology (BoIT)** | यु. सी. सी. |
| ठराव | It was resolved that the proposal for approval for the conversion of Director, Center Computing Facility to Director Department of information technology is accepted and the ornogram attached at enclosure A is also accepted. (परिशिष्ट– 'अ') | |
| बाब क्र. ११ | **A proposal of the MOU which was approved by MOU Committee & BOD meeting Dt. 31st December, 2019.** | **Garware Institute of Career Education and Development.** |
| ठराव | सदर बाब विषय पत्रिकेवरून मागे घेण्यात आली. | |
| बाब क्र. १२ | **दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीचे इतिवृत्त मंजूरीसाठी सादर.** | विद्यापीठ क्षेत्र विकास कक्ष |
| ठराव | दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीचे इतिवृत्तास बाब क्र. ४१ वगळून मंजूरी देण्यात आली. | |
| बाब क्र. १३ | **Design, Supply and Installation & Commissioning of the Rooftop Solar System at Vidyanagari Campus, University of Mumbai.** | विद्यापीठ क्षेत्र विकास कक्ष |
| ठराव | सदर बाब विषय पत्रिकेवरून मागे घेण्यात आली. | |
| | **आयत्यावेळी आलेल्या बाबी** | |
| बाब क्र. १४ | **मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत पालघर, सिंधुदुर्ग व रायगड येथे विद्यापीठ उपपरिसर सुरू करण्याबाबात.** | विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत पालघर, सिंधुदुर्ग व रायगड येथे विद्यापीठ उपपरिसर सुरू करण्याबाबातच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली व सदर उपकेंद्रासाठी तीन संचालकासह तसेच आवश्यक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांची पदे निर्माण करून तशी मागणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरले. | |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करण्याकरिता समिती गठीत करण्यात यावी. समिती गठित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| समिती | १. Prin. Dr. Kurhade - DTSS college<br>२. Prin. N.K. Phadke - wada college<br>३. Registrar - UOM | |
| बाब क्र. १५ | वित्त व लेखा समितीच्या दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | वित्त व लेखा समितीच्या दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. तसेच वित्त व लेखा समितीच्या बाब क्र.७ नुसार वित्त व लेखा समितीच्या पत्र क्र.क्र.वि.व.ले/वि ५/सेनिवे/७२४/२०२० व पत्र क्र.वि.व.ले/वि ५/सेनिवे/७२४/२०२०, दिनांक ७ फेब्रुवारी, २०२०अन्वये सेवा निवृत्त झालेल्या २४ कर्मचा-यांची अदांजित सेवा निवृत्त वेतन, निवृत्त वेतनाचे अंशराशीकरण व सेवा निवृत्ती उपदान याबाबत निवृत्ती कर्मच-यांना विद्यापीठ फंडातून लाभ दयावयाचा झाल्यास येणारा अपेक्षीत खर्च रू. २,०८,४३,५०९/-(दोन कोटी आठ लाख,त्रेचाळीस हजार, पाचशे नऊ फक्त) व रू ६,९०,६४०/-(सहा लाख नव्वद हजार, सहाशे चाळीस फक्त) एकुण रू. २,१५,३४,१४९/-(दोन कोटी, पंधरा लाख, चौतिस हजार, एकशे एकोणपन्नास फक्त) तपशील परिशिष्ठ ब प्रमाणे सादर करण्यात आला. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, **परिशिष्ठ ब** मध्ये नमुद केलेल्या २४ सेवा निवृत्त कर्मचा-यांना नियमानुसार निवृत्त वेतन, निवृत्त वेतनाचे अंशराशीकरण व सेवा निवृत्ती उपदान इ. लाभ विद्यापीठ फंडातून देण्यात यावेत. तद्वतच परिशिष्ट–'ब' मधील कर्मचाऱ्यांच्या यादीची पडताळणी करुन उपरोक्त कर्मचारी विद्यापीठ फंडावरील । निवृत्त लाभ अदा करण्यात यावेत. | |
| बाब क्र. १६ | युजीसी २०१६ च्या नियमावलीनुसार एम.फिल आणि पी.एचडी. प्रवेश पूर्व परीक्षा घेण्याबाबात. | परिक्षा मुल्यमापन मंडळ व प्रंबध विभाग. |
| ठराव | युजीसीच्या २०१६ च्या नियमानुसार १४ एम.फिल आणि पी.एचडी. प्रवेश पूर्व परीक्षा घेण्याबाबातच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. १७ | National Centre for Nanoscience and Nanotechnology (NCNN) येथील तीन शिक्षकांच्या सेवा नियीमत करणेबाबत. | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग |
| ठराव | National Centre for Nanoscience and Nanotechnology (NCNN) येथील १. डॉ. अतुल चासकर, डॉ. सुहास जेलुरकर व डॉ. प्रविण वाळके या तीन शिक्षकांच्या सेवा नियीमत करण्याबाबत खालील मृद्दयानुसार मान्यता देण्यात आली.<br>१. उपरोक्त तीनही शिक्षकांच्या सेवा १ फेब्रवारी , २०१९ पासून नियमित करण्यात याव्यात. तसेच त्या अनुषंगाने सदर सेवा नियमित केल्याबाबतचे पत्र त्यांना देण्यात यावे.<br>२. उपरोक्त तीनही शिक्षकांच्या नियुक्ती दिनाकांपासून ते १ जानेवारी, २०१९ पर्यंत काल्पनिक वेतनवाढी देऊन १ जानेवारी, २०२० पासून नियमितरित्या वेतन अदा करण्यासाठी मान्यता देण्यात आली. | |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | ३. सदर तीनही शिक्षकांना १ फेब्रुवारी, २०१९ पर्यंतच्या सेवेमधील कालखंड हा नियमित कालावधी (Non Break) गृहीत धरण्यात यावा असे मान्य असल्यास त्या अनुषंगाने सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत हित लाभ मूळ नियुक्ती दिनांकापासून देण्यास मान्यता देण्यात आली.<br>४. सदर शिक्षकांची प्रथम नियुक्तीच्या वेळी Ph.D ही अर्हता धारक केलेली असल्यामुळे सहाव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णय दिनांक १२ ऑगस्ट,२००९ मधील मृद्दा 7(i) अन्वये ५ अग्रीम वेतनवाढी अदा करण्याबाबत मान्यता देण्यात आली.<br>५. उपरोक्त शिक्षकांनी प्रथम नियुक्ती दिनांकापासून १ फेब्रुवारी,२०१९ पर्यंत या कालावधीतील थकीत वेतनाची मागणी करणार नाही असे मा. विधी सल्लागार यांनी मंजूर केलेलया नमून्यानुसार असलेले प्रतिज्ञा पत्र विद्यापीठास सादर करणे, त्याप्रमाणे या शिक्षकांची मा. उच्च न्यायालय प्रलंबित असलेली Writ Petition विना अट मागे घेण्याच्या अधिन राहूनच या विषयास मान्यता देण्यात आली. | |
| | **चर्चेच्या अनुषंगाने पारित झालेले ठराव:-** | |
| १. | Adv.Neel Helekar has placed the report of the committee constituted to took into recommendation of Shri page committee in the matter of appointment of Dr. Aruna Deshpande, Smt. Kavita Mishra and Shri Javed Kalangade at Alkesh Diesh Mody Institute of the Financial Management, University of Mumbai- and explained the same.<br>It was resolve that the report of the committee comprising of Dr. Rashmi Oza (convener ) Deepakkunar Makadam and Adv.Neel Helekar be accepted. | |
| २. | मा. कुलगुरूंनी सांगितले की, बाबा आमटेंची नातीकडुन प्रस्ताव आला आहे की, जर विद्यापीठाने कलिना परिसरात २ एकर जागा दिली की त्यामध्ये ते वनराई प्रस्थापित करण्यात येईल. सदर प्रस्तावास तत्वता: मान्यता देण्यात आली.<br>याबाबत सविस्तर प्रस्ताव लवकरच सादर करण्यात यावा. | कुलगुरूंचे कार्यालय व CDU |
| ३. | सुरक्षा अधिकारी व सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांकरीता गणवेश निर्धारीत करण्यासाठी गठित केलेल्या समितीचा अहवाल मान्यतेस्तव सादर मुंबई विद्यापीठातील सुरक्षा अधिकारी व सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांकरीता गणवेश निर्धारीत करण्याकरीता व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे समिती गठित केली होती, असे कुलसचिवांनी सांगितले.<br>१. प्राचार्य (डॉ.) अजय भामरे - निमंत्रक<br>२. प्रा. (डॉ.) चंद्रशेखर कुलकर्णी - सदस्य<br>३. श्री. नामदेव डी. बुकाणे - सदस्य<br>उपरोक्त विषयाबाबत समितीने अभ्यासपूर्ण अहवाल तयार केला. सुरक्षा अधिकारी व सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांना विशिष्ठ गणवेश असणे गरजेचे व महत्वाचे देखील आहे. अशी चर्चा बैठकीमध्ये करण्यात आली. | |



a 5/5

Scanned by CamScanner

परिशिष्ट -ब

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यानुसार समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली व समितीने शिफारस केलेला गणवेश तातडीने संबंधितांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश परिषदेने दिले. समितीचे एक सदस्य व सुरक्षा अधिकारी श्री. नामदेव डी.बुकाणे यांनी या अहवालास त्यांची पूर्णतः सहमती नसल्याचे लिहून वेगळे निवेदन अहवालासोबत सादर केले.<br>यावर चर्चा करताना समिती अध्यक्षांनी उपरोक्त निर्धारीत केलेला गणवेश हा श्री. नामदेव डी. बुकाणे यांच्या मतानुसारच नमुद करण्यात आला असल्याची स्पष्टोक्ती दिली. समितीच्या बैठकीमध्ये प्रारुप अहवालास सहमती दर्शविणे व अहवालावर स्वाक्षरी करण्यास नकार देऊन स्वतंत्र मुद्दे सादर करणे ही बाब अत्यंत गंभीर असल्याचेदेखील व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी चर्चेदरम्यान व्यक्त केले. श्री. बुकाणे यांनी सादर केलेल्या मुद्यांना तार्कीक आधार नसल्याची स्पष्ट भुमिका परिषदेने घेतली व या बाबत संबंधितांना विचारणा का करण्यात येऊ नये, असा प्रश्न उपस्थित केला. चर्चेअंती अहवालामध्ये निर्दीष्ट केलेल्या गणवेशास परिषदेने मान्यता दिली. | |

कुलसचिवांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

18/02/2020

सहायक कुलसचिव

28/2/2020

कुलसचिव

प्र-कुलगुरू

कुलगुरू

19 OCT 2020



Scanned by CamScanner

परिशिष्ट - अ




Scanned by CamScanner

परिशिष्ट – ब

# मुंबई विद्यापीठ

सेवा निवृत्ती लाभ कक्ष
क्र.वि.वले./वि.५/सेनिवे/८२४/ /२०२०
मुंबई – ४०००३२

०७ फेब्रुवारी, २०२०

प्रति,
उपकुलसचिव
आस्थापना विभाग (२/४)
मुंबई विद्यापीठ
फोर्ट,
मुंबई – ४०० ०३२.

विषय:– सेवानिवृत्त (२३) कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती लाभाची माहिती सादर करणे.

संदर्भ:– क्र. इएसटी/आयसीडी/२०१९–२०/२७२७
दि. ०५ फेब्रुवारी, २०२०

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भीय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, सेवानिवृत्त झालेल्या २४ कर्मचाऱ्यांपैकी २३ कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके प्राप्त झाली आहेत त्यांचे अंदाजित सेवानिवृत्ती वेतन, निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण व सेवा निवृत्ती उपदान याबाबतच्या माहितीचा तक्ता सोबत जोडत आहे.

२३ सेवा निवृत्ती कर्मचाऱ्यांना लाभ विद्यापीठ फंडातून द्यावयाचे झाल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| सेवा निवृत्ती वेतन (२३ कर्मचारी)<br>प्रति माहे. रु. ५,४१,५९६/– | रु. ६४,९९,१५२/–( वार्षिक) |
| निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण | रु. ७१,५०,४३७/– (One time) |
| सेवा निवृत्ती उपदान | रु. ७१,९३,९२०/– (One time) |
| **एकूण** | रु. २,०८,४३,५०९/– |

उपकुलसचिव
(वित्त व लेखा)

Scanned by CamScanner

# ESTIMATED BURDEN OF PENSION AND OTHER RETIREMENT BENEFITS IN R/O 23 RETIRED EMPLOYEES FROM UNIVERSITY FUND

| SR. NO | NAME OF EMPLOYEE | DESIGNATION | DATE OF BIRTH | DATE OF JOINING | DATE OF RETIRMENT | BASIC | GRADE PAY | TOTAL PAY | PENSION | CURRENT D.A. @164% | TOTAL PENSION | COMMUTATION 40% | COMMUTATION VALUE | GRATUITY AMOUNT |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 1 | SHRI. ASHOK P. DANGE | ASSISTANT REGISTRAR | 11-05-1957 | 26-03-1984 | 31-05-2015 | 19960.00 | 5400.00 | 25360.00 | 12680.00 | 20796.00 | 33476.00 | 5072.00 | 509493.00 | 393080.00 |
| 2 | SMT. REEMA ARVIND THAKUR | SUPERINTENDENT | 08-07-1958 | 15-11-1979 | 31-07-2016 | 16970.00 | 4400.00 | 21370.00 | 10685.00 | 17524.00 | 28209.00 | 4274.00 | 429332.00 | 352605.00 |
| 3 | SMT. VIMAL SATISH BHOITE | DEPUTY REGISTRAR | 08-12-1958 | 18-10-1983 | 31-12-2016 | 22360.00 | 6600.00 | 28960.00 | 14480.00 | 23748.00 | 38228.00 | 5792.00 | 581818.00 | 477840.00 |
| 4 | LATE SHRI GUNAJI MATKAR | MALI | 01-06-1964 | 01-03-1994 | 06-02-2017 | 9610.00 | 1800.00 | 11410.00 | 5705.00 | 9357.00 | 15062.00 | 0.00 | 0.00 | 262430.00 |
| 5 | SHRI. MADHUKAR D. SALVI | WATCHMAN | 05-06-1957 | 01-06-1986 | 30-06-2017 | 10020.00 | 2200.00 | 12220.00 | 6110.00 | 10021.00 | 16131.00 | 2444.00 | 240314.00 | 189410.00 |
| 6 | SHRI. SATYADEV VARMA | STORE-CUM-CAST. ASTT. | 09-11-1959 | 01-09-1980 | 30-11-2017 | 21110.00 | 4300.00 | 25410.00 | 12705.00 | 20837.00 | 33542.00 | 5082.00 | 510498.00 | 419265.00 |
| 7 | SHRI. RAMAKANT PATIL | LIFTMAN | 08-03-1958 | 02-11-1982 | 31-03-2018 | 10680.00 | 1800.00 | 12480.00 | 6240.00 | 10234.00 | 16474.00 | 2496.00 | 245427.00 | 205920.00 |
| 8 | SHRI. ANAND G. CHANDURKAR | SR. CLERK | 01-06-1960 | 21-10-1982 | 30-06-2018 | 11700.00 | 2400.00 | 14100.00 | 7050.00 | 11562.00 | 18612.00 | 2820.00 | 283275.00 | 232650.00 |
| 9 | SHRI. SUBHASH THUBE | ASSTT. ACCOUNTANT | 01-06-1960 | 21-03-1985 | 31-05-2018 | 14020.00 | 2400.00 | 16420.00 | 8210.00 | 13465.00 | 21675.00 | 3284.00 | 329885.00 | 270930.00 |
| 10 | SHRI. V. G. TELI | D.T.P. OPERATORE | 01-06-1960 | 01-09-1980 | 31-05-2018 | 15720.00 | 4300.00 | 20020.00 | 10010.00 | 16417.00 | 26427.00 | 4004.00 | 402210.00 | 330330.00 |
| 11 | LATE SHRI. RAVINDRA KHAMKAR | DRIVER | 19-10-1971 | 16-08-1994 | 30-06-2018 | 11390.00 | 2100.00 | 13490.00 | 6745.00 | 11062.00 | 17807.00 | 0.00 | 0.00 | 323760.00 |
| 12 | SHRI. PRAKASH G. CHAVAN | CARPENTER | 04-06-1960 | 14-11-1988 | 30-06-2018 | 17120.00 | 3250.00 | 20370.00 | 10185.00 | 16704.00 | 26889.00 | 4074.00 | 409242.00 | 300457.50 |
| 13 | SMT. FEDILIES KARKERA | H.G. STENO | 30-06-1960 | 04-07-1984 | 30-06-2018 | 21110.00 | 4300.00 | 25410.00 | 12705.00 | 20837.00 | 33542.00 | 5082.00 | 510498.00 | 419265.00 |
| 14 | SMT. SUPRIYA MASURKAR | SUPERINTENDENT | 09-08-1960 | 09-11-1984 | 31-08-2018 | 17770.00 | 4400.00 | 22170.00 | 11085.00 | 18180.00 | 29265.00 | 4434.00 | 445405.00 | 365805.00 |
| 15 | SHRI. GAJANAN MAHADIK | WATCHMAN | 01-10-1958 | 01-06-1986 | 30-09-2018 | 10360.00 | 2100.00 | 12460.00 | 6230.00 | 10218.00 | 16448.00 | 2492.00 | 245034.00 | 202475.00 |
| 16 | SHRI. MANOHAR D. JANGAM | WATCHMAN | | | | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 17 | LATE SHRI. PRAVIN GURAV | SR. CLERK | 02-09-1968 | 16-12-1992 | 30-09-2018 | 11720.00 | 2400.00 | 14120.00 | 7060.00 | 11579.00 | 18639.00 | 0.00 | 0.00 | 338880.00 |
| 18 | LATE SHRI ANANT BORE | WATCHMAN | 01-05-1962 | 03-08-1984 | 02-10-2018 | 11610.00 | 2200.00 | 13810.00 | 6905.00 | 11325.00 | 18230.00 | 0.00 | 0.00 | 455730.00 |
| 19 | SHRI. PANDURANG B. KAP | PLUMBER | 01-11-1960 | 05-11-1979 | 31-10-2018 | 17750.00 | 3250.00 | 21000.00 | 10500.00 | 17220.00 | 27720.00 | 4200.00 | 421899.00 | 346500.00 |
| 20 | SHRI. RAVINDRA B. SAWANT | HAWALDAR | 19-10-1958 | 16-10-1982 | 31-10-2018 | 11220.00 | 1800.00 | 13020.00 | 6510.00 | 10677.00 | 17187.00 | 2604.00 | 256047.00 | 214830.00 |
| 21 | SHRI. R. B. KAMBLE | WATCHMAN | 07-11-1958 | 19-01-1987 | 30-11-2018 | 9910.00 | 1600.00 | 11510.00 | 5755.00 | 9439.00 | 15194.00 | 2302.00 | 226352.00 | 184160.00 |
| 22 | SMT. JYOTI BAKSHI | SUPERINTENDENT | 20-11-1960 | 14-04-1980 | 30-11-2018 | 18130.00 | 4400.00 | 22530.00 | 11265.00 | 18475.00 | 29740.00 | 4506.00 | 452637.00 | 371745.00 |
| 23 | SHRI. BODAL NARAYAN | WATCHMAN | 10-12-1958 | 01-09-1986 | 31-12-2018 | 9890.00 | 1600.00 | 11490.00 | 5745.00 | 9422.00 | 15167.00 | 2298.00 | 225958.00 | 186712.50 |
| 24 | SHRI. MANGESH KAMBLE | SUPERINTENDENT | 06-12-1960 | 14-02-1985 | 31-12-2018 | 16760.00 | 4400.00 | 21160.00 | 10580.00 | 17352.00 | 27932.00 | 4232.00 | 425113.00 | 349140.00 |
| | TOTAL.................... | | | | | | | | | | 541596.00 | | 715[illegible]437.00 | 7193920.00 |

Note:-

1) Colum No. 12 Is Estimated amount of total monthly pension for 23 Employee's

2) Colum No. 14 & 15 is one time payment estimated amount of Gratuity & Commutation Value for 23 Employee's

Asstt. Registrar (F&A)-V
Post Retirement Benefits Section
University of Mumbai

Scanned by CamScanner

# मुंबई विद्यापीठ

**सेवा निवृत्ती लाभ कक्ष**
क्र.वि.वले./वि.५/सेनिवे/८२५/ /२०२०
मुंबई – ४०००३२

०७ फेब्रुवारी, २०२०

प्रति,
उपकुलसचिव
आस्थापना विभाग (२/४)
मुंबई विद्यापीठ
फोर्ट,
मुंबई – ४०० ०३२.

विषय:– सेवानिवृत्त श्री. मनोहर धोंडलींग जंगम यांच्या
सेवानिवृत्ती लाभाची माहिती सादर करणे.

संदर्भ:– क्र. इएसटी/आयसीडी/२०१९–२०/२७२७
दि. ०५ फेब्रुवारी, २०२०

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भीय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, सेवानिवृत्त झालेले श्री. मनोहर धोंडलींग जंगम यांचे सेवा पुस्तक प्राप्त झाले आहे त्यांचे अंदाजित सेवानिवृत्ती वेतन, निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण व सेवा निवृत्ती उपदान याबाबतच्या माहितीचा तक्ता सोबत जोडत आहे.

श्री. मनोहर धोंडलींग जंगम यांना सेवानिवृत्ती लाभ विद्यापीठ फंडातून द्यावयाचे झाल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| सेवा निवृत्ती वेतन<br>प्रति माहे. रु. १७, ५३०/– | रु. २,१०,३६०/–( वार्षिक) |
| निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण | रु. २,६१,१६०/– (One time) |
| सेवा निवृत्ती उपदान | रु. २,१९,१२०/– (One time) |
| **एकूण** | रु. ६,९०,६४०/– |

उपकुलसचिव
(वित्त व लेखा)

Scanned by CamScanner

# ESTIMATED BURDEN OF PENSION AND OTHER RETIREMENT BENEFITS IN R/O SHRI MANOHAR D. JANGAM

| SR. NO | NAME OF EMPLOYEE | DESIGNATION | DATE OF BIRTH | DATE OF JOINING | DATE OF RETIRMENT | BASIC | GRADE PAY | TOTAL PAY | PENSION | CURRENT D.A. @164% | TOTAL PENSION | COMMU TATION 40% | COMMUTAT ION VALUE | GRATUITY AMOUNT |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 1 | SHRI. MANOHAR D. JANGAM | WATCHMAN | 27-09-1958 | 03-01-1983 | 30-09-2018 | 11280.00 | 2000.00 | 13280.00 | 6640.00 | 10890.00 | 17530.00 | 2656.00 | 261160.00 | 219120.00 |
| | TOTAL.................... | | | | | | | | | | 17530.00 | | 261160.00 | 219120.00 |

Note:-

1) Column No. 12 is Estimated amount of total monthly pension
2) Column No. 14 & 15 is one time payment estimated amount of Gratuity & Commutation Value

Sd/-
२४।२।२०२०
Asstt. Registrar (F&A)-V
Post Retirement Benefits Section
University of Mumbai

Scanned by CamScanner